पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
सोलापूर विद्यापीठ
।। विद्यया संपन्नता ।।
NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**

केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)

दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७८ / ११३/११५ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,

संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac.in ई-मेल:, registrar@sus.ac.in bos@sus.ac.in



## अभ्यासमंडळे विभाग

जा.क्र.पुअहोसोविसो/अमंवि/२०२१/1632 दि. 18 FEB 2021

प्रति

**मा. प्राचार्य/प्राचार्या/संचालक**

कला, वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी, विधी, शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण

सर्व संलग्नित महाविद्यालये/सर्व संकुले

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**विषय : सुवर्णपदक विजेत्या स्नातकासाठी सुधारित नियमावली लागू केलेबाबत.**

संदर्भ : दि.२२/०१/२०२१ रोजी मा. व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विषय क्र. १६ (१) वर झालेला ठराव.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, यापूर्वी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात सुवर्णपदक विजेत्या स्नातकासाठी लागू असलेली सुधारित नियमावली विद्यापीठाच्या जा.क्र.पुअहोसोविसो/अमंवि/२०१९/५९१९ दि.३१/०७/२०१९ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आली होती.

या अनुषंगाने संदर्भीय ठरावानुसार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातून पदवी/पदव्युत्तर उत्तीर्ण स्नातकांमधून सुवर्णपदकाचा विजेता/मानकरी निश्चित करण्यासाठी गुणवत्ता यादी तयार करणे व सुवर्णपदक विजेता ठरविणे तसेच सुवर्णपदक पुरस्कृत करण्यासाठी सुवर्णपदकासाठी देणगीदारांकडून प्रस्ताव स्विकारण्याबाबतची नियमावली दि.२२/०१/२०२१ रोजीच्या मा. व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत ठेवले असता, मा. व्यवस्थापन परिषदेने खालीलप्रमाणे ठराव पारित केला आहे.

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातून पदवी/पदव्युत्तर उत्तीर्ण स्नातकांमधून सुवर्णपदकाचा विजेता/मानकरी निश्चित करणेसाठी गुणवत्ता यादी तयार करणे व सुवर्णपदक विजेता ठरविणे तसेच सुवर्णपदक पुरस्कृत करण्यासाठी सुवर्णपदकासाठी देणगीदाराकडून प्रस्ताव स्विकारण्याबाबतची दि.१६ जुलै, २०१९ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेने पारित केलेल्या ठराव क्र. २० मधील नियमावलीमध्ये खालील सुधारणा/दुरूस्ती करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

| सुवर्णपदकाचा प्रस्ताव स्विकारण्याची नियमावली | |
|---|---|
| १) | **देणगीदाराने सुवर्णपदकासाठी किमान रु. ३,००,०००/- (अक्षरी रूपये तीन लाख फक्त) रक्कम कायमस्वरूपी विद्यापीठात ठेवणे आवश्यक आहे.** |

सदर ठरावाची छायांकित प्रत आपल्या सुलभ संदर्भासाठी सोबत जोडण्यात आली आहे. सबब, वरील बाब आपल्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

(प्रा. डॉ. वि. भा. घुटे)
प्र.कुलसचिव

सोबत : वरीलप्रमाणे.

प्रत : मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, यांना याची एक प्रत देवून विनंती करण्यात येते की, अगामी होणा-या दीक्षांत समारंभापासून सदर नियमावली अमंलात आणावयाची आहे.

मा. कुलगुरु तथा अध्यक्ष महोदय यांच्या परवानगीने आयत्या वेळेचे विषय:

[१६(१)] पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातून पदवी/पदव्युत्तर उत्तीर्ण स्नातकांमधून सुवर्णपदकाचा विजेता/मानकरी निश्चित करणेसाठी गुणवत्ता यादी तयार करणे व सुवर्णपदक विजेता ठरविणे तसेच सुवर्णपदक पुरस्कृत करण्यासाठी सुवर्णपदकासाठी देणगीदाराकडून प्रस्ताव स्वीकारण्याबाबतची दि.१६ जुलै, २०१९ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेने ठराव क्र. २० अन्वये मान्यता दिलेली सुधारित नियमावली फेरविचारार्थ.

व्यवस्थापन परिषद
विषय क्रमांक (16(1))
दिनांक :- 22 JAN 2021

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातून पदवी/पदव्युत्तर उत्तीर्ण स्नातकांमधून सुवर्णपदकाचा विजेता/मानकरी निश्चित करणेसाठी गुणवत्ता यादी तयार करणे व सुवर्णपदक विजेता ठरविणे तसेच सुवर्णपदक पुरस्कृत करण्यासाठी सुवर्णपदकासाठी देणगीदाराकडून प्रस्ताव स्वीकारण्याबाबतची दि.१६ जुलै, २०१९ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेने ठराव क्र. २० अन्वये मान्यता दिलेली सुधारित नियमावली फेरविचारात घेऊन, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातून पदवी/पदव्युत्तर उत्तीर्ण स्नातकांमधून सुवर्णपदकाचा विजेता/मानकरी निश्चित करणेसाठी गुणवत्ता यादी तयार करणे व सुवर्णपदक विजेता ठरविणे तसेच सुवर्णपदक पुरस्कृत करण्यासाठी सुवर्णपदकासाठी देणगीदाराकडून प्रस्ताव स्वीकारण्याबाबतची दि.१६ जुलै, २०१९ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेने पारित केलेल्या ठराव क्र. २० मधील नियमावलीमध्ये खालील सुधारणा /दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

| सुवर्णपदकाचा प्रस्ताव स्विकारण्याची नियमावली | |
|---|---|
| १) | देणगीदाराने सुवर्णपदकासाठी किमान रु.३,००,०००/- (अक्षरी रुपये तीन लाख फक्त) रक्कम कायमस्वरुपी विद्यापीठात ठेवणे आवश्यक आहे. |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
NAAC Accredited-2015 'B' Grade (CGPA 2.62)

अभ्यासमंडळे विभाग
दि.१०/०२/२०२१

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
सोलापूर विद्यापीठ
।। विद्यया संपन्नता ।।
NAAC Accredited - 2015
'B' Grade (CGPA - 2.62)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

संदर्भ : १) दि.१६/०७/२०१९ रोजीच्या मा. व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील ठराव क्र. २०.
२) दि.२२/०१/२०२१ रोजीच्या मा. व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील ठराव क्र. १६ (१).

## गुणवत्ता यादी तयार करण्याबाबतची सुधारित नियमावली

१) गुणवत्ता यादीची नियमावली ही सर्व अभ्यासक्रमांकरिता (व्यावसायिक व अव्यावसायिक) एकच राहिल.

२) गुणवत्ता यादी ही पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाची जाहिर केली जाईल. (पदविका/अर्धवेळ अभ्यासक्रम/प्रमाणपत्र अभ्यासक्रम यांची गुणवत्ता यादी जाहीर केली जाणार नाही.) तथापि, पुर्नपरीक्षार्थी/श्रेणीसुधार, Re-Degree या विद्यार्थ्यांचा गुणवत्ता यादीत समावेश केला जाणार नाही.

३) ज्या कालावधीत परीक्षेच्या आधारे पदवी दिली जाईल, त्या कलावधीतील परीक्षेतील गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी जाहीर केली जाईल.

४) ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश हे विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयात/मान्यता प्राप्त संस्था/ विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागात संबंधित अभ्यासक्रमातील विहित कालावधीमध्ये सलगपणे झालेले असेल अशाच विद्यार्थ्यांचा गुणवत्ता यादीत समावेश केला जाईल. उदा. B.A/B.Com/B.Sc हा अभ्यासक्रम तीन वर्षाचा कालावधीत सलगपणे पूर्ण करणे आवश्यक आहे.

५) ज्या अभ्यासक्रमास ५०० पेक्षा जास्त विद्यार्थी अंतिम परीक्षेस बसले असतील, त्या अभ्यासक्रमाच्या गुणवत्ता यादीमध्ये ०५ विद्यार्थ्यांच्या नावांचा समावेश केला जाईल. ५०० पेक्षा कमी विद्यार्थी संख्या असल्यास तीन विद्यार्थ्यांच्या नावाचा समावेश गुणवत्ता यादीत केला जाईल.

६) पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी किमान कालावधीची अट लागू असून त्यासाठी सलगपणे परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी. उदा. एम.ए./एम.कॉम./ एम.एस्सी./एम.फॉर्मसी. इ. अभ्यासक्रमास प्रविष्ठ असताना सलग दोन वर्षात एम.ए./एम.कॉम./ एम.एस्सी./एम.फॉर्मसी उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

७) सुवर्णपदक प्राप्त करण्यासाठी वरीलप्रमाणे अभ्यासक्रमामधला विद्यार्थी एकही Backlog परीक्षा न देवून सर्व सत्र परीक्षांमध्ये एका संधीमध्ये उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे.

अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

(कृ. मा. प.)

८) गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना विद्यापीठाकडून गुणवत्ता प्रमाणपत्र देण्यात यावीत.

९) वरील नियमासंदर्भात काही अडचणी निर्माण झाल्यास त्यावर निर्णय घेण्याचा अधिकार मा. कुलगुरुंना राहील.

## सुवर्णपदक विजेता विद्यार्थी ठरविताना आवश्यक असलेली नियमावली

१) ज्या प्रवर्गाकरिता सुवर्णपदक ठेवण्यात आले आहे, त्या प्रवर्गात तो विद्यार्थी गुणवत्तेने प्रथम असावा.

२) दोन किंवा त्यापेक्षा अधिक विद्यार्थ्यांना समान गुण असल्यास सुवर्णपदक देताना देणगीदाराने संबंधित विषयासाठी, अभ्यासक्रमासाठी एकच सुवर्णपदक जाहीर केलेले असल्याने ते केवळ एकाच विद्यार्थ्यांस दिले जाईल. अशा वेळेस सुवर्णपदकधारक विद्यार्थ्याचे नाव ठरविताना सदर विद्यार्थ्यांच्या त्यांच्या मागील वर्षाच्या परीक्षेचे संपादित गुण विचारात घेतले जातील.

३) वरील नियमासंदर्भात काही अडचणी निर्माण झाल्यास त्यावर निर्णय घेण्याचा अधिकार मा. कुलगुरुंना राहील

## सुवर्णपदकाचा प्रस्ताव स्विकारण्याची सुधारित नियमावली

१) देणगीदाराने सुवर्णपदकासाठी किमान रु. ३,००,०००/- (अक्षरी रुपये तीन लाख फक्त) रक्कम कायमस्वरुपी विद्यापीठात ठेवणे आवश्यक आहे.

२) देणगीदार व ज्यांच्या नावे सुवर्णपदक द्यावयाचे आहे, त्यांची गुण्हेगारी पार्श्वभूमी नसावी.

३) ज्याच्या नावे सुवर्णपदक द्यावयाचे आहे त्या व्यक्तीचे शैक्षणिक व सार्वजनिक क्षेत्रात भरीव योगदान असणे आवश्यक आहे.

४) विशिष्ट विषयासाठी दिल्या जाणाऱ्या सुवर्णपदकाकरिता ज्यांच्या नावे सुवर्णपदक दिले जाणार आहे त्या व्यक्तीचे संबंधित विषयात योगदान असणे आवश्यक आहे.

५) पदवीदान समारंभ आचारसंहितेच्या काळात असल्यास व देणगीदार किंवा ज्याच्या नावे सुवर्णपदक आहे, अशी व्यक्ती निवडणूक लढवीत असल्यास सदर सुवर्णपदक आचारसंहिता संपुष्टात आल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांस प्रदान करण्यात येईल.

६) सुवर्णपदकासाठी आलेला प्रस्ताव स्वीकारणे किंवा नाकारण्याचा संपूर्ण अधिकार विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेस राहील.

प्र-कुलगुरु
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)
दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७८ / ११३/११५ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,
संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac.in ई-मेल:, registrar@sus.ac.in bos@sus.ac.in

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)

अभ्यासमंडळे विभाग

जा.क्र.पुअहोसोविसो/अमंवि/२०१९/5919 दिनांक : 31 JUL 2019

प्रति,
मा. प्राचार्य/प्राचार्या/संचालक
कला, वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी,विधी, शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण
सर्व संलग्नित महाविद्यालये/सर्व संकुले
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ,
सोलापूर

विषय: **सुवर्णपदक विजेत्या स्नातकासाठी सुधारित नियमावली लागू केलेबाबत.**
संदर्भ: दि.१६/०७/२०१९ रोजी व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विषय क्र. २० वर झालेला ठराव

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयी संदर्भीय ठरावाच्या अनुषंगाने आदेशान्वये कळविण्यात येते की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात सुवर्णपदक विजेत्या स्नातकासाठी लागू असलेली नियमावली सुधारित करण्यासंदर्भात मा. व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत मा. प्र-कुलगुरु महोदय यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्याचा निर्णय झाला होता.

सदर समितीने अभ्यास करुन सुधारित नियमावली तयार करुन दि.१६/०७/२०१९ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत ठेवले असता. व्यवस्थापन परिषदेने खालीलप्रमाणे ठराव पारित केला आहे.

"पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठात सुवर्णपदक विजेत्या स्नातकासाठी तयार करण्यात आलेली सुधारित नियमावलीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली." सदर ठरावाची छायांकित प्रत आपल्या सुलभ संदर्भासाठी सोबत जोडण्यात आली आहे.

सबब, वरीलबाब आपल्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

(डॉ. वि. भा. घुटे)
कुलसचिव

सोबत: वरीलप्रमाणे
प्रत: मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन विभाग, यांना याची एक प्रत देऊन विनंती करण्यात येते की, अगामी होणाऱ्या दीक्षांत समारंभापासून सदर नियमावली अमंलात आणावयाची आहे.

[ २० ] **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठात सुवर्णपदक विजेत्या स्नातकासाठी तयार करण्यात आलेली सुधारित नियमावली व्यवस्थापन परिषेदच्या विचारार्थ.**

व्यवस्थापन परिषद
विषय क्रमांक ( २० )
दिनांक :- 16 JUL 2019

(टिपणी: दि.१६/०१/२०१९ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत आयत्या वेळेचा विषय क्र.[११ (११)] व चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला होता.

ठराव: विद्यापीठाकडे विविध देणगीदार सुवर्णपदकासाठी देणगी देत आहेत. सदर देणगी स्वीकारत असताना विद्यापीठाकडील नियमावलीमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे उपसमिती नियुक्त करण्याचे ठरले.

१) मा. डॉ. एस. आय. पाटील: अध्यक्ष
२) मा. प्रा. एम. एम. माने: सदस्य
३) मा. डॉ. बी. पी. रोंगे: सदस्य
४) मा. डॉ. एच. के. आवताडे: सदस्य
५) मा. डॉ. बी. एन. आदटराव: सदस्य
६) मा. श्रीमती. डॉ. एस. आय. शेख: सदस्या

उपरोक्त सन्मानीय अध्यक्ष व सदस्यांची बैठक विद्यापीठाचे पत्र जा.क्र. पुअहोसोविसो/अमंवि/२०१९/४६९६, दि.१३/०६/२०१९ अन्वये दि.१९/०६/२०१९ रोजी सकाळी ११:०० वा. विद्यापीठाच्या बैठक कक्षात आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत विद्यापीठातंर्गत पदवी व पदव्युत्तर वर्गात सर्वप्रथम येणाऱ्या सुवर्णपदक विजेत्या विद्यार्थ्यांसाठी सध्याच्या नियमावलीवर सर्वकष चर्चा करुन सुधारित नियमावली खालीलप्रमाणे तयार करण्यात आली आहे.

<u>**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर**</u>

गुणवत्ता यादी तयार करण्याबाबतची सुधारित नियमावली खालीलप्रमाणे:

| | |
|---|---|
| १) | गुणवत्ता यादीची नियमावली ही सर्व अभ्यासक्रमांकरिता (व्यावसायिक व अव्यावसायिक) एकच राहिल. |
| २) | गुणवत्ता यादी ही पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाची जाहिर केली जाईल. (पदविका/अर्धवेळ अभ्यासक्रम/प्रमाणपत्र अभ्यासक्रम यांची गुणवत्ता यादी जाहीर केली जाणार नाही.) तथापि, पुनर्परीक्षार्थी/श्रेणीसुधार, Re-Degree या विद्यार्थ्यांचा गुणवत्ता यादीत समावेश केला जाणार नाही. |
| ३) | ज्या कालावधीत परीक्षेच्या आधारे पदवी दिली जाईल, त्या कलावधीतील परीक्षेतील गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी जाहीर केली जाईल. |
| ४) | ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश हे विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयात/मान्यता प्राप्त संस्था/ विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागात संबंधित अभ्यासक्रमातील विहित कालावधीमध्ये सलगपणे झालेले असेल अशाच विद्यार्थ्यांचा गुणवत्ता यादीत समावेश केला जाईल. उदा. B.A/B.Com/B.Sc हा अभ्यासक्रम तीन वर्षाचा कालावधीत सलगपणे पूर्ण करणे आवश्यक आहे. |
| ५) | ज्या अभ्यासक्रमास ५०० पेक्षा जास्त विद्यार्थी अंतिम परीक्षेस बसले असतील, त्या अभ्यासक्रमाच्या गुणवत्ता यादीमध्ये ०५ विद्यार्थ्यांच्या नावांचा समावेश केला जाईल. ५०० पेक्षा कमी विद्यार्थी संख्या असल्यास तीन विद्यार्थ्यांच्या नावाचा समावेश गुणवत्ता यादीत केला जाईल. |

अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

| | |
|---|---|
| ६) | पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी किमान कालावधीची अट लागू असून त्यासाठी सलगपणे परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी. उदा. एम.ए./एम.कॉम./ एम.एस्सी./एम.फॉर्मसी. इ. अभ्यासक्रमास प्रविष्ठ असताना सलग दोन वर्षात एम.ए./एम.कॉम./ एम.एस्सी./एम.फॉर्मसी उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. |
| ७) | गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना विद्यापीठाकडून गुणवत्ता प्रमाणपत्र देण्यात यावीत. |
| ८) | वरील नियमासंदर्भात काही अडचणी निर्माण झाल्यास त्यावर निर्णय घेण्याचा अधिकार मा. कुलगुरुंना राहील. |
| **सुवर्णपदक विजेता विद्यार्थी ठरविताना आवश्यक असलेली नियमावली** | |
| १) | ज्या प्रवर्गाकरिता सुवर्णपदक ठेवण्यात आले आहे. त्या प्रवर्गात तो विद्यार्थी गुणवत्तेने प्रथम असावा. |
| २) | दोन किंवा त्यापेक्षा अधिक विद्यार्थ्यांना समान गुण असल्यास सुवर्णपदक देताना देणगीदाराने संबंधित विषयासाठी, अभ्यासक्रमासाठी एकच सुवर्णपदक जाहीर केलेले असल्याने ते केवळ एकाच विद्यार्थ्यास दिले जाईल. अशा वेळेस सुवर्णपदकधारक विद्यार्थ्याचे नाव ठरविताना सदर विद्यार्थ्याच्या त्यांच्या मागील वर्षाच्या परीक्षेचे संपादित गुण विचारात घेतले जातील. |
| ३) | वरील नियमासंदर्भात काही अडचणी निर्माण झाल्यास त्यावर निर्णय घेण्याचा अधिकार मा. कुलगुरुंना राहील |
| **सुवर्णपदकाचा प्रस्ताव स्विकारण्याची नियमावली.** | |
| १) | देणगीदाराने सुवर्णपदकासाठी किमान रु. ५०००००/- रक्कम (अक्षरी पाच लाख) कायमस्वरुपी विद्यापीठात ठेवणे आवश्यक आहे. |
| २) | देणगीदार व ज्यांचे नावे सुवर्णपदक द्यावयाचे आहे. त्यांची गुन्हेगारी पार्श्वभूमी नसावी. |
| ३) | ज्याच्या नावे सुवर्णपदक द्यावयाचे आहे त्या व्यक्तीचे शैक्षणिक व सार्वजनिक क्षेत्रात भरीव योगदान असणे आवश्यक आहे. |
| ४) | विशिष्ट विषयासाठी दिल्या जाणाऱ्या सुवर्णपदकाकरिता ज्यांच्या नावे सुवर्णपदक दिले जाणार आहे त्या व्यक्तीचे संबंधित विषयात योगदान असणे आवश्यक आहे. |
| ५) | पदवीदान समारंभ आचारसंहितेच्या काळात असल्यास व देणगीदार किंवा ज्याच्या नावे सुवर्णपदक आहे. अशी व्यक्ती निवडणूक लढवीत असल्यास सदर सुवर्णपदक आचारसंहिता संपुष्टात आल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यास प्रदान करण्यात येईल. |
| ६) | सुवर्णपदकासाठी आलेला प्रस्ताव स्वीकारणे किंवा नाकारण्याचा संपूर्ण अधिकार विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेस राहील. |

सबब, उपरोक्त सुवर्णपदकाची सुधारित नियमावली विचारार्थ).

ठराव: **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठात सुवर्णपदक विजेत्या स्नातकासाठी तयार करण्यात आलेली सुधारित नियमावलीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

व्यवस्थापन परिषद
विषय क्रमांक (२०)
दिनांक :- 16 JUL 2019